# दुसरे प्रकरण

## पाणिपतची बखर -

## एक वाङ्मयीन आकलन

# प्रकरण दुसरे

## पाणिपतची बखर : एक वाङ्मयीन आकलन

पानिपतच्या बखरी संबंधी संपादक हेरवाडकर पानिपतच्या बखरीच्या प्रस्तावनेत म्हणतात, "पानिपतचा संग्राम किंवा मराठी-दुराणी युध्द हे महाराष्ट्राच्या इतिहासातील केवळ नव्हे तर भारतीय इतिहासातील एक महान पर्व होय. लौकिकदृष्ट्या या युध्दात अपयश प्राप्त झाल्यामुळे मराठी सत्तेला पायबंद बसला तरी एका दृष्टीने मराठ्यांच्या पराक्रमाचा तो उत्कर्षबिंदू होता." पानिपतच्या युध्दाची आठवण झाली की आज ही मराठी माणूस हळहळून जातो. या पानिपत संग्रामाचे वर्णन असणारी ही 'पाणिपतची बखर' आहे.

### कथावस्तू-

१.बखरीचे लेखन-

ही बखर नानासाहेब पेशव्यांची पत्नी गोपिकाबाईसाहेब यांच्या आज्ञेवरून रघुनाथ यादव या पेशवे दरबारातील कारकुनाने ही बखर १० जानेवारी ते १८ फेब्रुवारी १७६३ या चाळीस दिवसांत पानिपतच्या युध्दानंतर दोन वर्षांनी लिहिली. त्याने ती मोहिम व युध्द प्रत्यक्ष पाहिले होते.

२.भाऊसाहेबांची हिंदुस्थानात रवानगी-

श्रीमंत शाहुमहाराज छत्रपती यांनी निर्वाण समयी राजश्री नानासाहेब व भाऊसाहेब यांना सातारा येथे बोलवून आपल्या मागे राज्यकारभार आपण योग्य प्रकारे करावा असे सांगून नानासाहेबांना पेशवेपदाची वस्त्रे दिली. नानासाहेब व भाऊसाहेब यांनी बारा वर्षे प्रयत्न करून एक छत्री विशाल राज्य उभे केले. भाऊसाहेबांचा पराक्रम पाहून नानासाहेबांना असे वाटले की, हिंदुस्थानात फौज घेवून जाण्यास भाऊसाहेब योग्य आहेत. त्यावेळी महादजीपंत पुरंदरे यांनी

नानासाहेबांना विनंती केली की, भाऊसाहेबांना हिंदुस्थानच्या मोहिमेवर पाठवू नका कारण भाऊसाहेब हे एकदा ठरवतील ते करतील मग प्राण गेला तरी चालेल आणि तेच एकमेव राज्यकारभार चालविण्यासाठी योग्य कुशल आहेत. त्यावर नानासाहेबांनी सांगितले की भाऊसाहेबांचीच इच्छा आहे की आपण हिंदुस्थानच्या मोहिमेवर जावे. तेव्हा गोपिकाबाई यांनी भाऊसाहेबांना जाण्यास अनुमोदन दिले आणि त्याबरोबर आपला मुलगा विश्वासराव यांनाही त्यांच्याबरोबर पाठविले. त्याचबरोबर अनेक नामांकित सरदार आणि युध्दाचे सर्व साहित्य सोबत देवून पाठविले.

त्यांच्यासोबत मल्हारजी होळकर, दमाजी गायकवाड, जनकोजी शिंदे, यशवंतराव पवार, समशेर बहादूर, त्र्यंबक सदाशिव यांसारखे शूर सरदार होते. आणखी जाट व मराठी असे लहान थोर सव्वालाख सैनिक, चार हजार सरकारी तोफा बाराशे जरबा, चाळीस हजार बाणांच्या कैच्या, शिवाय दारूगोळा असे शहाण्णव कुळीचे मराठे व बावन बिरदाचे धनी घेवून भाऊसाहेब पटदूरहुन जालन्याच्या आग्नेयेस सत्तावीस मैल इ.स. १३ मार्च १७६० या दिवशी उत्तरेकडे निघाले. ग्वालेर, चंबळ, आग्रा, मथुरा असे करत यमुनेच्या काठास येवून पोहोचले. वाटेत मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार तसेच पेंढारी लोक ही सर्व मंडळी येवून मिळाली. त्यावेळी मराठ्यांचे सैन्य सुमारे तीन लक्ष होते.

३.भाऊची शुजाकडे वकीली-

मराठ्यांच्या सैन्याला काही अडथळे निर्माण झाल्यानंतर व रजपुतांचे मराठ्यांशी वैर असल्यामुळे ते बाजूला राहिले. तेव्हा भाऊसाहेबांनी अबदालीला शह देण्यासाठी शुजाकडे मित्रत्वाच्या दृष्टीने वकील पाठविला. ''मागे अबदाली इराणी बेईमानी होऊन बादशाहीचा ऱ्हास केला.दिल्लीपत बादशाहीत बाकी राहिली नाही. तुम्ही व नजीबखान रोहिला मिळून इराणीस घेवून येता ही गोष्ट अनुचित. यात काही ताजगी होता दिसत नाही. इराणीस पेश होऊ न देता तुम्ही व आम्ही एक होऊन पेशजींचे उसने घेवून अगदी नेस्तनाबूत करावा, अबदाली इराणी मोठ्या उल्हासे मजल दरमजल येतो. त्यास ठायीचे ठायी रोकावे हे उत्तम आहे. इराणी यांनी लाहोर फत्ते केली. बादशाही सिंहासने मोडीत चालला असे असता तुम्ही इराणीस आंग दिल्हे, हे उत्तम केले नाही.'' [१] पण यावर सुजातदौले व नजिबखान यांनी भाऊसाहेबांनाच उध्दटपणे उत्तर पाठविले की,''रजपूत बदमस्ती करितात, त्यासही जरब देवून व तुम्हीही बंडे करून दरवर्षी या प्रांती येवून बादशाही बळजोरीने कायम करू पाहता, याविशी तुम्हास इजा द्यावी हा मतलब आमचा आहे या परता दुसरा मतलब आमचा काही नाही.'' [२] अशा तऱ्हेने सुजात दौले, नजिबखान यांनी अनेक रजपूत राजे, पठाण, चितोडकर राजे, उदेपूरकर इ. राजांशी संगनमत करून मराठ्यांवर बदनजर धरली.

४.बादशाही छताचा विध्वंस व जाट-

सुरजमल जाटांनी भरतपूर येथे राहून गनिमी काव्याचा आश्रय करून मराठ्यांनी अबदालीशी युध्द करावे असा भाऊसाहेबांना सल्ला दिला. भाऊंनी जाटाकडे बादशाही खजिन्यातून सैन्याच्या खर्चासाठी रक्कम मागितली. जाटाला भाऊसाहेबांविषयी अविश्वास वाटला. त्याने भाऊसाहेबांना कळविले. ''बादशाही खजिना हुकमाबिगर खर्च करावयाचा नाही. तुम्ही लुटावयास सिध्द जाहले असता पुढे मागे आम्हास नामोशी येईल.''[३] असा घाट बोलण्यात आणून जाटाने फेरबद्दलची गोष्ट सांगितली की, ''आम्ही बादशाही चाकर बहुत दिवसांचे असता, आमचे डोळ्यादेखत ही गोष्ट घडावी, ही रीत आम्हा जाट-रजपुतास अनुचित. बादशाही तक्त आम्ही रक्षावे. येथे एकनिष्ठपणे वर्तावे. हुकमाबिगर खजीना फोडावयास दक्षणी बारग्यांची फौज आली असता बेलाशक तरवार चालेल आणि तुमचा आमचा भाईपणा राहणार नाही. आम्ही बादशाही पूर्वापार चाकर तुमचे एकंदर ऐकणार नाही. या उपर समजोन राहाणे.''[४] हे ऐकून भाऊसाहेब सावध झाले. ते समजून गेले की जाट हे विश्वास घातकी आहेत हेच आमचे शत्रू. यांचा भरवंसा नाही. तेव्हा विचार करून त्यांनी ''तुम्हास जे मान्य ते आम्हांसही मान्य.'' असे मल्हाररावांच्याकडे जाटाला कळविले.बादशाही कायम करावी आणि शत्रूचा पराभव करावा असे दोघांनी ठरविले. भाऊसाहेब आणि जाट मनांनी दुरावले. वरकरणी प्रेम सांभाळून जाट स्वदेशी गेला. भाऊसाहेबांनी बादशाही सिंहासनाचे छत फोडून त्यातील रत्ने, सोने मिळवून सैन्यात पैसे वाटले आणि ते यमुनाकिनारी फौजेसह दाखल झाले. त्यानी इराणीचा रस्ता अडविला. आतापर्यंत सैन्याच्या खर्चासाठी एकूण सात कोटी रूपये आले होते. सैन्यात आता दाणावैरणीची टंचाई झाली. सैन्य मोठे असल्याने त्याच्या अन्नधान्यासाठी एकावेळी पंचवीस गावे लुटली जात असत. सैन्यात महागाई खूप वाढली. मराठी सैन्यास उपासमार होऊ लागली.

५.मराठ्यांचा अबदालीशी सामना-

मराठी सैन्याची दु:स्थिती सुजात दौला याने दुराणीला तपशीलवार कळविली. इराणी कुच करून यमुनातीरास फौजेसह आला. दोन-तीनशे नावांचा पूल करून इराणीचे सैन्य यमुना नदी उतरू लागले. त्यावेळी मराठ्यांनी सातशे-आठशे तोफा डागल्या. इराण्याचे भरपूर सैन्य ठार झाले. पिछाडीचे सैन्य तर मराठी सैन्याच्या दहशतीने पळून गेले. त्यानंतर भाऊसाहेबांनी इराणीकडे वकील पाठवून त्याच्याशी दोन हात करण्याची इच्छा कळविली. त्यावर इराणीने आपल्या वकीलाकडून भाऊसाहेबांना कळविले-आम्हीच यमुना उतरून पैलतीरास येतो. आम्ही युध्दास तयार आहोत. अबदाली, सुजात दौले आणि नजिबखान आपापसात म्हणू लागले,''मराठे बडे कट्टे लढनेवाले. उनके आगे खुदा खडा रहनेका नही. अनाजका दुकाल पडा तोभी लढनेकु हटेले खडे रहते है ---मराठे लोगोंका बडा जोर नजर आता है।''[५]

अबदालीचे सैन्य पुन्हा एकदा ~~जोर करू~~ तयारी करून यमुना नदी उतरू लागले. मराठ्यांनी तोफगोळ्यांच्या आगीचा पाऊस पाडला. तरीही ते सैन्य नदी उतरून आले. कुरूक्षेत्रावर पश्चिमेकडे इराणी सैन्य तर पूर्वेकडे भाऊसाहेबांचे सैन्य उभे राहिले. दोन्ही सैन्ये सावध होती. 'कोणी युध्दास प्रवर्तेना' अशा तऱ्हेने समोरासमोर दोन्ही सैन्यांच्या छावण्या मुक्काम करून राहिल्या. दोन महिने असेच गेले. इराण्याने हल्ला केलाच नाही. सैन्यांच्या तळाजवळची वीस पंचवीस गावे बेचिराख झाली. मराठी सैन्याला दाणा वैरण मिळेनाशी झाली. भाऊसाहेबांच्या सैन्यावर मोठे संकट गुदरले.

भाऊसाहेबांनी सैन्याचे तीन भाग केले. मल्हारराव होळकर, विश्वासराव आणि स्वत: भाऊसाहेब प्रत्येकी पन्नास-साठ हजार सैन्य घेऊन उभे राहिले. इराणीच्या सैन्याचेही तीन भाग केले गेले. अगदी पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत युध्द झाले. मराठ्यांच्या तोफा जबरदस्त दणाणल्या. मोठी हातघाई झाली. चालून आलेल्या गिलच्यांवर भाऊसाहेब सरळ चालून गेले. मराठी सैन्याने अबदालीच्या सेनेला त्यांच्या छावणीपर्यंत रेटीत मागे नेले. मराठ्यांनी लढाईची शर्थ केली. 'अबदल्ली शिकस्त खाऊन फौजेसुध्दा मागे सरून गोठात गेले.' 'मराठी फौज आम्हास मोजता दिसत नाही.' असे अबदलीस वाटले.

६.इराणीचा प्रस्ताव-भाऊंचा नकार-लढाई-

दुराणीने सुजातदौला व नजीबखान रोहिला यांच्याशी चर्चा करून वकीलाकरवी भाऊसाहेबांना निरोप पाठविला. ''तुम्ही जोरावर होऊन अटकेची सरहद्द मारवाड व लाहूर प्रांत व बंगाला व अंतखेद काशी प्रयाग व गया व काश्मीरपावेतो मुलुख काबीज करावयाची उमेद धरून बादशाही खजीना बंद केला. चितोड, गुजरात, आग्रा प्रांतातील खंडणी घेवून अंम्मलकरिता या खेरीज दिल्ली म्हणजे बादशाही तख्ताची जागा तेथील अमर्यादा करून फौज दरवर्षी पाठवून कैदकानु तुम्ही आपली बसविली. हे सर्व बंद करून नर्मदा दक्षिण तीरापासून पलीकडील हद्द संरक्षण करून असावे. तुमचे फौजेस घासदाण्याबद्दल दोन कोटी रूपये व एक कोटी रूपये स्वारीखर्च, येणेप्रमाणे रोख देऊन बादशाही सनद नवीन करून देतो. त्याबरहुकुम बादशहाची नोकरी करीत जाणे. ही गोष्ट तुमचे खातरीस न येई तरी लढाई करावी लागेल.'' त्यावर भाऊसाहेबांनी त्याला सडेतोड उत्तर केले की, ''हिंदुपत बादशाहीचे बंदोबस्त करणे तो आमीच करू. तुम्ही पद्द पातशाहीचे असता आपली हद्द सरद टाकून इकडे आला. तुम्ही फौजेसुध्दा माघारे जावे. लढाई करावी हाच आमचा निश्चय आहे.'' हे ऐकून इराणीने भाऊसाहेबांना 'उद्या युध्दास तयार रहा. आम्हीच चालून येतो.' असा निरोप दिला. एकमेकांच्या आव्हानामुळे युध्दास तोंड फुटले. भाऊसाहेबांनी लहान थोर सरदारांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करून सैनिकांची रचना केली. सर्व सरदारांना उद्देशून स्तुती केली व लढाईस सज्ज राहण्याचा

आदेश दिला. तेव्हा सरदारांनी उत्तर केले की, ''भाऊसाहेब महाराज आम्ही तरी जीवित्वाची तमा धरत नाही. इराणीची कथा किती ? मारून गर्दीस मिळवून देवू.'' भाऊंनी लहानथोर सरदारांना एकत्र बोलावून त्यांना शिरपेच, मोत्याचा कंठा, वस्त्रे बहाल केली. त्यांचा सन्मान केला. दुसरे दिवशी पहाटे सर्व सैन्य युध्दसज्ज झाले. भाऊंनी व इराणीने सैन्याचे चार चार भाग केले. दोन्ही सैन्यांचे तोफखाने धडाडू लागले. आकाश धुराने भरले. मराठा सैन्य शत्रू सैन्यावर तुटून पडले. ही दुसरी लढाई सात तासांची झाली. दोन्हीकडील पस्तीस हजार सैन्य मेले. "संग्राम महाधुरंधर जाहला.'' लढाईची हातघाई जाहाली. 'न भूतो न भविष्यति' असे युध्द झाले. या चौफेर लढाईमध्ये मराठ्यांकडील बळवंतराव मेहंदळे कामी आले. त्यांच्याबरोबर त्याची पत्नी सती गेली.अनेक सरदार मृत्यूमुखी पडले. अनेक सरदार जखमी व घायाळ झाले.

स्वत: भाऊसाहेब घोड्याखाली उडी टाकून जीवाची पर्वा न बाळगता सैनिकांना ठार मारीत फौजेतुन चालले. त्याबरोबर निवडक मराठा सरदारही पायबुतार झाले. त्वेषाने लढले. हे युध्द देवांसह इंद्राने विमानातून पाहिले. 'धन्य त्या वीरश्री वैभवाची !' इराणी मनात म्हणू लागला. ''हे मराठे तरवारीस आपणास ऐकत नाहीत ! आपणही आता माघार घेणार नाही.'' असेच शत्रूने ठरवले होते. भाऊंच्या सैन्याने मोठी धडक देऊन इराणीला त्यांच्या छावणीच्या मागे रेटत नेले.

दोन्हीकडील फौजेची व तोफांची खराबी झाली. शत्रूंचे तीस हजार सैन्य ठार झाले. 'दुतर्फा नाश बहुत जाहला.' इराणी सुजातदौला व नजिबखान यांना म्हणाला, ''ब्राह्मणाने मोठा धुमाकूळ घातला. मराठे जिद्दीचे आहेत. त्यांना जिंकणे शक्य दिसत नाही. तह करावा हे बरे !'' त्यामुळे त्या दोघांनी भाऊंकडे संपर्क साधला, पण भाऊसाहेब हट्टाला पेटले होते. शत्रूंची हत्यारे काढून घेवून त्यांना देशोधडीला लावावे हाच त्यांचा निश्चय होता. भाऊसाहेबांनी तहाची ही दुसरी संधी धुडकावली. वरील तिन्ही लढाईत घायाळ झालेल्या सैनिकांना भाऊंनी औषधपाणी केले. त्यांचा दररोज समाचार घेतला. त्यांना बक्षिसे दिली.

७.बुंदेल्यांचे पतन-

परंतु दाणा वैरणी अभावी सैनिक उपासपोटी मरू लागले. उपाय काहीच चालेनासा झाला. शत्रूंच्या लष्करात यमुना नदी पलीकडून सर्व अन्न धान्य येत होते. त्यांना काहीच तोटा पडत नव्हता. तेव्हा भाऊसाहेब संकटात आले. त्यांनी गोविंदपंत बुंदेले यांना दिल्लीत खजिना आणण्यास पाठविले. ही बातमी शत्रूच्या गोटास समजताच अबदालीने गोविंदपंतावर पाळत ठेवून गोविंदपंत खजिना घेवून येत असताना अबदालीने गोविंदपंतावर अताईखानास पाठविले. त्याने गोविंदपंत व त्याचे साथीदार बेसावध असताना त्याच्यावर हल्ला करून त्याचा शिरच्छेद केला व मराठ्यांचा दाणा गोटा व खजिना लुटुन नेला. गोविंदपंताची पत्नी त्याबरोबर सती

गेली. दिवसेंदिवस अन्न मिळेनासे जाहले. घोड्यास दाणावैरण मिळेनाशी झाली.

८.भाऊसाहेबांची समजावणी-

तेव्हा मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे, दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, अंताजी माणकेश्वर व संताजी अटोळे वगैरे लहान थोर सरदारांनी विचार निनिमय करून सांगितले की,''भाऊसाहेब उपाशी मरण्यापेक्षा शेवटचा निकराचा हल्ला करून युध्दात मरणे बरे. आज सव्वा महिन्यांत तवाई सर्वांनी सोसली. अन्नावाचून घोड्यामाणसांचे प्राण जातात. पुढे महाराज काय तजवीज सांगणे ती सांगावी ! अन्नावाचून हात पाय सुजले. डोळ्यांपुढे अंधाऱ्या येतात. आता जीवीत्वाची तमा धरून रांडापोरे वाचतात असा अर्थ नाही. तुम्ही सर्वांचा घात केला. विनाशकाळासारखी तुमची बुध्दी जाहली. आपल्या हातून सर्व वैभव बुडविले. आमच्या डोळ्यादेखत आमची रांडापोरे गिलचा बाटवितो. आपण तिळमात्र कोणाचे ऐकत नाही.'' [६] तेव्हा त्यावर भाऊसाहेबांनी सर्व सैनिकांची समजूत घातली. ''होणारास उपाय काय? कोणी आपण आपले अनिष्ट चिंतीत नाही. दैवगतीने घडून आल्यास उपाय कोणाचा? यश किंवा अपयश महाराज छत्रपतींकडे ! आता शरीर तृणप्राय मानून मर्दुमीचा हिय्या न सोडिता समशेरीची शर्थ करून दाखवावी. कौरव पांडव सकल सेनेसहित कुरूक्षेत्री धारातीर्थी सुस्नात जाहाले, तदनुरूप आपणही व्हावे या परता पराक्रम कोणता? सर्व सत्ता श्री कैलासनाथाची ! त्याप्रमाणे घडून येते. दुषणे लाविता ती प्रमाणच. गेल्या गोष्टी पुढे येतात असे नाही. प्रस्तुत पुढची विचारणा चित्तात आणून यश छत्रपतींचे सांभाळावे. हे यश तुम्हा समस्तांचे आहे ! निदान समय सागर-तारक पिनाकपाणी आहे, मग इराणीची तमा ती काय? आता भय धरल्याने काय होते? श्री सांब कृपेने इराणीस मारून गर्दीस मिळवून देवू. सत्कीर्ती करून मरावे या भूषणापरते दुसरे काय आहे?'' ''उद्या सर्वांनी खंदकपार होऊन मारता मारता कटून मरावे. या भूषणापरते दुसरे काय आहे?'' [७] असे सांगून भाऊसाहेबांनी लहान थोर सरदारांना विडे दिले.

भाऊसाहेबांनी विश्वासराव, सदाशिवराव पुरंदरे व महिपतराव चिटणीस व अप्पाजी जाधवराव व अंताजी माणकेश्वर व रामजी अनंत दाभोळकर, सदाशिव अप्पाजी मागे या सर्व मंडळींना बोलवून त्यांच्याशी विचार विनिमय केला. विश्वासरावांबद्दल त्यांना गहिवर आला. ते म्हणाले,''रावसाहेब ! तुम्हास मी मरणाचे घरी आणले. ही गोष्ट सर्वोपरी आमचे पासून गेली!''[८] व डोळ्यांत पाणी आणले. त्यावर विश्वासरावांनी उत्तर केले की,''माझे प्राणांविषयी मजला तिळमात्र काळजी वाटत नाही. परंतु हा समय आपल्यावर गुजरला.मागे नानासाहेब तुम्हावाचून घटकाभर प्राण ठेवणार नाहीत ! आपण उभयता बंधू एक धर्मराज व एक अर्जुन, किंवा एक श्री रामचंद्र व एक भरत याप्रमाणे पराक्रमी असता हा प्रसंग पाहून आल्यास श्रीमंत नानासाहेबांची काय गत होईल ती कळेना. तुम्ही उभयता बंधू कायम असल्यास माझे सारखे

पुत्र बहुत होतील ! त्यावर भाऊसाहेब विश्वासरावांना आलिंगन देवून म्हणू लागले की, आमी तरी सतीचे वाण घेतले. आता तुम्हास ईश्वर साह्य आहे." [९] त्यावर विश्वासरावांनी उत्तर केले की, आपण वडील संनिध असता मला भय काय? त्यातून ईश्वरी इच्छेकरून ही गोष्ट बनून आली असता दुसरा पराक्रम जन्मास येवून कोणता करावा?"

९.युध्दास प्रारंभ-

भल्या पहाटे सैन्यात ललकारी झाली. सैन्याचे तीन भाग केले गेले. विश्वासरावांकडे सत्तर हजार सैन्य होते. भाऊ मध्यभागी होते. जनकोजींकडे साठ-सत्तर हजार सैन्य होते. मल्हाररावांवर भाऊंची पत्नी पार्वतीबाई व सरदारांच्या कुटुंबाच्या रक्षणाची जबाबदारी होती. शेवटचा निकाली संग्राम पौष शुध्द अष्टमी शके १६८२, १४ जानेवारी इ.स.१७६१ या दिवशी सुरू झाला. मराठे 'हरहर महादेव !' व दुराणी 'दीन दीन' अशी गर्जना करून लढू लागले. एकच गर्जना मारा मार झाली. बखरकार लिहितो, "तीन चार तासपर्यंत एकच घाई शर संधानाची जाहाली. मुर्द्यावर मुर्दे पडू लागले. वीरांच्या नजरा फिरोन गेल्या. आपपर कोणी ओळखेनासे जाहाले. वीर रणामध्ये माजले. रणमद चढला. खाशा, खाशांचे हौदे एकास एक लागून जोशवारीत लढो लागले. केवळ दशाग्नी शताग्नीशी मारू लागले. शिरे तुटोन धडावेगळी जाहाली. परंतु कोणी माघार घेईना." [१०] ह्या युध्दात भाऊसाहेबांनी अतिशय पराक्रम केला त्याचे वर्णन बखरकार करतात, "या मागे कलीयुगी असा योध्दा कोणी जाहला नाही पुढेही होणे जरूर. भारती युध्दासमान सदाशिव पंतानी (भाऊंनी)युध्द केले. धन्य त्याची जननी की असा पुत्र प्रसवली येणे करून सप्त पुरूष उध्दरून विष्णूलोकास गेले. धन्य त्या पुरूषाचा पिता ! त्यास साम्यता दशरथाची ! किंवा पंडूची ! चिमाजी आपाची धन्य की हा पुत्र रामाप्रमाणे निर्माण जाहला ! हे युध्द पाहुन स्वर्गी इंद्र व देवगण व गंधर्व स्तुती करू लागले की मानवी होऊन, जातीचा विप्र असता प्रताप कर्णाप्रमाणे केला! केवळ राम रावण यांच्या युध्द समान युध्द जाहाले." [११] या युध्दात विश्वासरावांना गोळी लागून त्यांचा मृत्यू झाला.

नंतर भाऊसाहेब विश्वासरावांचे अंबारीतील प्रेत पाहून परम दु:खी झाले. व मल्हारराव होळकरांना म्हणाले, "तुम्ही पुण्यास जावून निरोप सांगावा की, "तुमचे चिरंजीव विश्वासराव साहेब व भाऊसाहेब तीन लक्ष सेनेसहित इंद्रलोकी सुखरूप आहेत. काही चिंता न करावी. उभयतां वडिलांनी आजपासून लोभ चिरंजीव माधवराव साहेबांवर करीत जावा. पुढे काही दिवसांनी त्यांचे हातून संपूर्ण शत्रू लयास जाणार. मी परशुराम अवतार आणि चिरंजीव माधवराव साहेब केवळ अर्जुनाचा अवतार, आमचा संकल्प यांचे पराक्रमाने परिपूर्ण होणार." कदाचित शत्रूंनी तुमचा पाठलाग केल्यास आमच्या कुटुंबाचा शिरच्छेद तुम्ही आपल्या हाताने करावा. परंतु शत्रुच्या हाती जिवंत लागू देवू नका असे जनकोजीस ही सांगितले. त्यावर जनकोजीने उत्तर

केले की, "मी पुण्यास माघारा जावयाचा नाही. खावंद जर माघारे पुण्यास येतील तर मी जाईन. नाहीतर मी जेथे खावंदाचा जोडा पडेल, तेथे माझे शिरकमल पडेल ! यांत तिळमात्र अंतर नाही." त्यानंतर शिंदे-होळकरांनी व अनेक सरदारांनी भाऊसाहेबांना सांगितले की, "एवढे हट्टास पडायचे कारण नाही. आपणाला पुण्याला जावयाचे नसेल तर गंगा किंवा नर्मदेच्या काठी सहा महिने मुक्काम करून सर्व सोयीनुसार विचार करून पुन्हा युध्द करू. आणि छत्रपतींचे नाव राखू. यात अंतर नाही. पण आपण कोणाचे ऐकत नाही. पूर्वी चिमाजीआप्पा चार-दोन सरदारांचे ऐकत असत. त्यामुळे त्यांनी अनेक लढाया सर केल्या. तेव्हा भाऊसाहेबांनी त्यांना उत्तर केले की, "चिरंजीव विश्वासराव साहेब गोळी लागून कामास आले असता आपण मोठा पराक्रम करून पुण्यास गेलो तरी सौभाग्यवती गोपिकाबाई साहेब माझे मुखावलोकन करणार नाहीत कारण त्यांचे केवळ जिवाचे जीव विश्वासराव साहेब आहेत." [१२]

ह्या संधीचा फायदा घेऊन मलका जमानीने इराणी-दुराणी गिलचा यांच्याकडे पदर पसरून सांगितले की, "तुम्ही लढाईस कमकसर केली तर दिल्लीचे बादशहा फकीर होऊन देशांतरास जातील. मुसलमानी बादशाहीची शरम ठेवून आपण लढाई करावी. मराठे दरवर्षी येवून खंडण्या घेवून जातात व इजा देतात तेव्हा आपण त्यांचा बंदोबस्त करावा." हे ऐकून शत्रूंनी पुन्हा त्वेषाने युध्दात उडी घेतली.

१०.भाऊ-कल्पांतीचा आदित्य-

भाऊसाहेबांनीही अखेर युध्दात उडी घेतली. बखरकार लिहितात, "ते समयी भाऊसाहेब, ग्रीष्म ऋतूच्या दिवसात मेघाचे ढग उठतात आणि विद्युल्लता चमकून लागलीच नाहीशी होते त्याप्रमाणे भाऊसाहेबांनी संग्रामात उडी घेतली." [१३] पण यावेळी ईश्वराने शत्रू सैन्यास सहाय्य केले मराठी सैन्यावर ईश्वर रूष्ट झाला होता. त्यामुळे सर्वनाश झाला. हत्ती घोड्यांनी व उंटानी संपूर्ण खंदक भरला. पानिपतच्या लढाईत मराठी सैन्य पराभूत झाले. कित्येक शिपाई अधु झाले. कुणी नदीत जीव दिला. कित्येक शिपाई भिकारी होऊन अन्न अन्न म्हणून भटकू लागले.

११.नानासाहेबांचा शोक-

ही सर्व बातमी पुण्यात नानासाहेबांना मिळाल्यानंतर नानासाहेबांना भाऊसाहेबांचे वेड लागले ते रात्रंदिवस भाऊ-भाऊ म्हणून ओरडू लागले. झोपेतसुध्दा भाऊ भाऊ म्हणून उठू लागले. "माझी आंधळ्याची काठी चोरून नेली! माझे धनाचा चरू कोणी चोरून नेला. आता प्रपंचात राहून काही उपयोग नाही. आता देहत्याग करावा किंवा संन्यास घ्यावा अथवा वैराग्य घेवून भाऊसाहेब जिकडे गेले तिकडे जावे." त्यानंतर नानासाहेब सर्व कारभाऱ्यांना बोलवून त्यांच्याकडे कारभार सोपवून भाऊसाहेबांच्या आठवणीने हिंदस्थानच्या मोहिमेवर निघाले. खेचेवाडी येथे

गेले असता एके दिवशी रात्री भोजन करून बसले असता भाऊसाहेबांची आठवण आली. तिथे कलावंतीणीच्या नृत्याचा कार्यक्रम चालू होता तेव्हा नानासाहेब सर्व विसरून आनंदाने म्हणाले, "जी इच्छा असेल ती आज मागावी." तेव्हा त्या कलावंतीणीने नानासाहेबांना सांगितले की, "आपण दक्षिणेचे ब्राह्मण बादशाह, ज्या ठिकाणी भाऊसाहेब गेले आणि गर्क झाले ते ठिकाण आपण दृष्टीने पाहु नये व मोहिमेस आपण स्वत: जावू नये. दुसरे सरदार पाठवून शत्रूंची पारिपत्ये करावी हेच आम्हास बक्षीस द्यावे." [१४] दिलेले वचन पाळावे तसेच सर्व कारभारी यांनी विनंती करून मन वळविले. त्यामुळे नानासाहेब पुण्यास परतले. भाऊसाहेबांच्या वियोगाने त्यांचे निधन झाले.

## व्यक्तिचित्रण

पानिपतच्या बखरीत इतिहासातील स्त्री-पुरूषांचे व्यक्तिचित्रण दिसून येते. त्यात मानवी भाव भावनांचा तळ दृष्टीस पडतो. पुरूषांच्या व्यक्तिचित्रणाबरोबरच स्त्रियांच्या व्यक्तिचित्रणांमध्ये जिजाबाईपासून आनंदीबाईपर्यंत मराठ्यांच्या इतिहासातील व्यक्तिदर्शने जशी बखरीतून आली आहेत तशीच मुसलमानी स्त्रिया मलका जमानी व बादशाहाची बेटी बेगम यांचीही व्यक्तिदर्शने दिसून येतात. ह्या व्यक्ती कपोलकल्पित नाहीत. त्यामुळे ह्या व्यक्तिरेखांना ऐतिहासिक आणि जीवनविषयक महत्व प्राप्त झालेले आहे. ह्या इतिहासातील व्यक्तींचे गुणधर्म, स्वभाव विशेष रेखाटलेले दिसून येतात. पानिपत सारखा युध्द प्रसंग तर कौरव-पांडवांच्या युध्दाची आठवण करून देतो.

### १)भाऊसाहेब-

पानिपतच्या बखरीत भाऊसाहेबांच्या क्षात्रधर्माचे दर्शन घडविले आहे. भाऊसाहेब म्हणजे 'क्षात्रधर्म' असे बखरकारास वाटते.

१.क्षात्रधर्मावरील निष्ठा-'शरीर तृणप्राय मानून मर्दूमीचा हिया न सोडिता समशेरीची शर्थ करून दाखवावी--- कुरूक्षेत्री मृत्यू आल्यास दुसरे काय पाहिजे? संपूर्ण वसुंधरेचे राज्य करीन किंवा इंद्रपदीचे घेईन.' या भाऊसाहेबांच्या वचनातून त्यांची क्षात्रधर्माची निष्ठा व्यक्त होते. त्यामुळे ते करारी व धीरोदात्त ठरतात. सतीचे वाण घेवून पराक्रमाची शर्थ करणारे व जीवन सर्वस्व वाहणारे त्यांचे व्यक्तिमत्व क्षात्रधर्माचा आदर्श आहे.

२.युध्दकथेचा नायक-पानिपतची बखर दु:ख व अभिमान या दोन्हीही भावना जागृत करते. या युध्दकथेचा नायक आहे भाऊसाहेब ! त्याची महत्वाकांक्षा, दृढनिश्चयीपणा, स्वाभिमान, तडफ, शौर्य, धैर्य, कारभार कौशल्य व व्यवहारचातुर्य या गुणांचे दर्शन बखरीत आत्मीयतेने घडविले आहे. महद्दजीपंत पुरंदरे सांगतात "भाऊसाहेबांचे कारभारांचा हावभाव दुसरे कोणास

येणार नाही. सर्व राज्याचा भार त्याजवर आहे.'' या त्यांच्या उद्‌गारात भाऊसाहेबांची कर्तबगारी व मुत्सद्दीपणा व्यक्त झाला आहे. पानिपतच्या रोखाने निघालेल्या भाऊसाहेबांचे चित्रण भव्योदात्त व वीरश्रीयुक्त आहे. घोडदळ, पायदळ, तोफा, शस्त्रे यांच्या सज्जतेसह विशाल सैन्य मजल दरमजल करीत उत्तरेकडे जाते. सदाशिवपंत परमतवेशे करून हर्षभरीत चालले.' भाऊसाहेब परम आनंदोल्लासाने दिल्लीकडे निघाले.

३.निधडेपणा-भाऊंनी जाटांच्या व इराणीच्या वकिलांना दिलेली उत्तरे निधड्या छातीची व आत्मविश्वासपूर्ण आहेत. त्यात स्वाभिमान आहे. श्रध्दा आहे. ''आम्ही फरजंद लहान माणूस न हो--- इराणीचा हिशेब कोण धरतो? आमचे खातरेत नाही.'' असे बेदरकारपणे म्हणणाऱ्या भाऊसाहेबांचा आत्मविश्वास वकिली डावपेचाची युक्ति-प्रयुक्तीची बुध्दी यांचे यथार्थ चित्रण येथे आहे.

४.व्यवहारचातुर्य-बादशाही तक्ताचे विध्वंसन करून भाऊसाहेबांनी बहुत द्रव्य काढले. त्यामुळे जाट व भाऊसाहेब मनाने दुरावले. तथापि त्यांनी स्नेहभाव ठेवून व्यंगोक्ती दिसू दिली नाही. इथे भाऊसाहेब व्यवहारचतुर ठरतात.

५.दृढनिश्चय-अबदालीच्या निरोपाला भाऊ सडेतोड उत्तर देतात. त्यातूनच दुसरे युध्द पेटते. दोन्हीकडून पराक्रमाची शर्थ झाली. अबदालीने भाऊंकडे सलोख्याचे सूत्र लावले पण भाऊ ते ऐकत नाहीत. शत्रूंची हत्यारे हिसकावून घेवून देशोधडीस लावावे हाच त्यांचा निश्चय होता.

६.सैन्यावरील प्रेम-तीनही लढाईत घायाळ झालेल्या सैनिकांवर भाऊंनी वैद्याकरवी औषधोपचार केले. अशा सैनिकांची त्यांच्या जवळ जावून आस्थेने ते विचारपूस करीत. पुढील युध्दासाठी प्रोत्साहन म्हणून बक्षिसे देत. यातून त्यांचे आपल्या सैनिकांवरील प्रेम दिसून येते.

७.हट्टी व आग्रही-मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे इ. लहानथोर सरदार भाऊंकडे येतात आणि म्हणतात, ''सव्वा महिना झाला सैनिक उपासी पडू लागले. हातपाय सुजले मग तलवार कशी पेलणार? तुमचे बुध्दीस भ्रंश जाहला. कोणाचे तीळमात्र ऐकत नाही. उगीच हेका केला..... या हट्टाने सर्व लयास गेले. तुम्ही सर्वांचा घात केला.'' बरोबरीच्या सरदारांचा सल्ला भाऊसाहेब मानीत नसत हेच यावरून दिसून येते. या त्यांच्या गुणप्रकर्षामुळेच ते शोककथेचा नायक बनले.

८.भावजीवन-सरदारांची दुषणे ऐकुनही भाऊसाहेब स्थिरचित्तच आहेत. संयमाने ते सर्व ऐकतात. पुढच्या कार्याकडे त्यांची मने वळवतात. लढता लढता शूरपणाचे मरण मरण्याचे आवाहन करतात. भाऊच्या अंतरंगाचे हळूवारपण, विश्वासरावावरील प्रेम, अपयशाचे धनी

झाल्याची खंत, यामुळे त्यांना आलेला गहिवर,आपली पत्नी पार्वतीचा प्रसंगी शिरच्छेद करण्यास होळकरांना दिलेली आज्ञा याचे प्रत्ययकारी चित्रण करून भाऊंच्या भावजीवनाचे बखरकार दर्शन घडवितो.

९.कल्पांतीचा आदित्य-भाऊंनी रणांगणावर गाजवलेला पराक्रम अजोड आणि अतुलनीय होता. 'भाऊ कल्पांतीचा आदित्य भासला.' त्यांनी प्रताप कर्णाप्रमाणे केला. 'भाऊ म्हणजे केवळ परशराम अवतार' या अवतरणातून भाऊंचा भव्यादात्त पराक्रम स्पष्ट होतो. घोड्यावरून पायउतार होऊन सैन्यात शिरून शत्रूची कत्तल करीत जाणारे भाऊसाहेब हे कसलेले निष्णात सेनानी होते. 'कलियुगात असा योध्दा कोणी जाहला नाही.' हा बखरकाराने केलेला भाऊंचा गौरव लक्षणीय आहे.

१०.मानी सेनानी-युध्दाच्या अखेरच्या काळात मल्हारराव भाऊंना सैन्य माघारी नेऊन पुन्हा तयारी करून अबदालीचा समाचार घेण्याचा सल्ला देतात. पण विश्वासरावांचा मृत्यू झालेला असताना पुण्यास जायचे कसे? नाना साहेबांना व गोपिकाबाईंना तोंड दाखवायचे कसे? अशी त्यांच्यासमोर समस्या आहे. म्हणून 'मारता मारता मरावे.' असेच ते ठरवितात आणि युध्दाच्या रणधुमाळीत घुसतात. भाऊसाहेब हे मानी सेनानी आहेत. त्यांच्या व्यक्तिदर्शनातील हे मनोलेखन कलात्मक आहे.

एकंदरीत महाकाव्याचा नायक शोभावा असे भाऊसाहेबांचे व्यक्तिचित्रण वेधक व अनेक रंगछटांनी उठावदार झाले आहे.

## २)मल्हारराव होळकर-

पानिपतच्या बखरीत पेशव्यांना साथ देणारा, आपल्या पन्नास हजार फौजेनिशी लढणारा आणि भाऊसाहेबांशी युध्दविषयक मसलत करणारा मल्हारराव होळकर एक अनुभवी योध्दा असल्याचे दिसून येते.

१.वडिलधारीपणा-युध्दात जेव्हा अबदालीची सरशी होते. मराठ्यांच्या सैन्यास अन्न व घोड्यास दाणावैरण मिळेनाशी होते. अन्नाची महर्गता वाढते. तेव्हा सर्व सरदारांना घेवून होळकर भाऊसाहेबांना तह करण्याचे आवाहन करतात. मल्हाररावांनी केलेल्या आवाहनात त्यांची वडीलधारी, पोक्त व समंजस व्यक्तिरेखा प्रत्ययास येते. या समयीच्या त्यांच्या उद्‌गारामधून त्यांनी प्राप्त परिस्थितीमुळे नाउमेद व हतबल झालेली अवस्था प्रतीत होते. तरीही सैन्याचा 'विभू' कसा रचावा यासंबंधी ते भाऊसाहेबांना मार्गदर्शन करतात.

२.धैर्य-भाऊसाहेबांच्या उत्तरेतील आगमनापूर्वी अबदालीशी अपुऱ्या फौजेनिशी टक्कर देणारा त्यासाठी उत्तरेतील सत्तांचे सहाय्य घेवू इच्छिणारा आणि अबदालीने 'अकस्मात अकाल

पर्जन्य वारे हल्ला केल्याने दत्ताजी शिंदे ठार झाल्यावर चिंतार्णवी पडलेला मल्हारराव खचला तरी पुन्हा सावर धरून शत्रूंशी टक्कर देतो. यातून त्यांचे धैर्य, जिद्द दिसून येते.

३. प्रसंगावधान-अबदालीच्या प्रचंड सैन्यापुढे शिंदे होळकरांचे सैन्य कमी पडते. तरीही गनिमी काव्याचा उपयोग करून ते लढत राहतात. दक्षिणेतून येणाऱ्या कुमकेस लागलेला विलंब, समोर अबदालीचे प्रचंड सैन्य अशा प्रसंगी बदलत्या परिस्थितीनुसार बदलत जाणारे त्यांचे स्वभाववैशिष्ट्य दिसून येते. पुढे भाऊसाहेबांचे फौजेसह उत्तरेत आगमन झाल्यावर पानिपतच्या वृत्तांताचे निवेदन करताना बखरकाराने या प्रसंगाचे 'अघटित' प्रसंग असे वर्णन केले आहे. सैन्याची उपासमार आणि भाऊंचा दृढनिश्चयीपणा पाहून मल्हारराव होळकर भाऊंना सल्ला देवू पाहतात.

४.संयमी-भाऊसाहेब पत्नी-पार्वतीबाईंचे रक्षण करण्याची विनंती मल्हाररावांना करतात. परंतु भाऊसाहेबांच्या निर्वाणीच्या उत्तराने ते थक्क होतात. द्रव्य, राज्य हे जिवित्वापेक्षा जास्त नाहीत अशी भाऊंची समजूत घालून कृतनिश्चयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात. परंतु भाऊसाहेबांनी दिलेल्या उत्तरामुळे मल्हारराव होळकर निरूत्तर होतात. यातून होळकरांचा संयमी स्वभाव दिसून येतो.

५.अनुभवी-अखेरच्या समयी भाऊसाहेबांनी दिलेली आज्ञा व त्यांचे आग्रही बोलणे ऐकूनही मल्हारराव युध्दातून माघारे फिरण्याची विनंती करतात. ''हिंदुंचे मुसलमान होऊ परंतु छत्रपतींचे नाव राखू' अशी ते ग्वाही देतात. पेस्तर साली रूमशामची खबर घेण्याचे आश्वासन इत्यादींचा उत्कट प्रत्यय इथे येतो. या प्रसंगी मल्हाररावास चिमाजी आप्पाची आठवण होणे स्वाभाविक व वास्तव आहे. त्याने चिमाजी आप्पाचे नाव घेवून केलेल्या आवाहनात पूर्वानुभाव व वडीलधारेपणा दिसून येतो.

### ३) जनकोजी शिंदे-

जनकोजी हा जयाप्पा प्रमाणेच शूर होता. त्यांनी वेळोवेळी भाऊसाहेबांना योग्य सल्ला दिला. पण भाऊसाहेबांना तो पटला नाही. भाऊसाहेबांनी त्यांचा उपमर्द केला. तरीही त्यांनी संयम राखला. सुरजमल जाट पेशव्यांना सहाय्य करतो पण त्यांनाच लुटण्याचा प्रयत्न भाऊसाहेब करतात तेव्हा होळकरांच्या सहाय्याने जनकोजी सुरजमल जाटास सुरक्षितपणे बाहेर पाठवितो. यात जनकोजीचा प्रामाणिकपणा, वचननिष्ठा या गुणांचा प्रत्यय येतो. दत्ताजीच्या वधानंतर जनकोजी केवळ स्वत:च्या बळावर मोहिमा फत्ते करतो. लढाईत पिछेहाट होत असताना मल्हारराव होळकर व जनकोजी शिंदे यास भाऊंनी पुण्यास जाण्यास आज्ञा दिली. त्यावेळी जनकोजीने उत्तर दिले, ''मी पुण्यास माघारा जावयाचा नाही. खावंद जर माघारे पुण्यास येतील

तर मी जाईन नाहीतर जेथे खावंदाचा जोडा पडेल तेथे माझे शिरकमल पडेल.'' इथे त्यांची उत्कट स्वामीनिष्ठा दिसते.

शिंदे घराण्याचा अभिनिवेश, शौर्य, वचननिष्ठा, निर्भिड वृत्ती, आत्मविश्वास, प्रसंगावधान, कर्तबगारी असे अनेक गुण जनकोजी शिंदे यांचे अंगी दिसून येतात.

### ४)विश्वासराव-

''रावसाहेब तुमास मी मरणाच्या दारी आणले.'' या भाऊसाहेबांच्या उद्‌गाराला विश्वासरावाने भाऊसाहेबांची घातलेली समजूत तितकी करूण तितकीच उदात्त आहे. ''माझे प्राणाविषयी मजला तिळमात्र काळजी वाटत नाही. परंतु हा समय आपल्यावर गुजरला. मागे नानासाहेब तुम्हावाचून घटकाभर प्राण ठेवणार नाहीत! आपण उभयता बंधू एक धर्मराज व एक अर्जुन, किंवा एक श्रीरामचंद्र व भरत या प्रमाणे पराक्रमी असता हा प्रसंग घडून आल्यास श्रीमंत नानासाहेबांची काय गत होईल ती कळेना. तुम्ही उभयता बंधू कायम असल्यास माझे सारखे पुत्र बहुत होतील.'' यातून ते कर्तव्यनिष्ठ, धैर्यवान व प्रेमळ होते हे दिसून येते. पानिपतसारख्या मोठ्या मोहिमेत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. त्यामुळे त्यांचे नाव मराठ्यांच्या इतिहासात अमर झाले.

### (५)अबदाली-

बखरकाराने अबदालीचे चित्रण भाऊसाहेबांच्या प्रतिस्पर्ध्याला साजेसे केले आहे. भाऊसाहेबांस भेटी देणारा, हाबभरी होऊन मराठी फौजेचा पिच्छा पुरविणारा, पराभवाची वेळ येवून ठेपल्यावर सलोख्याची भाषा बोलणारा, भाऊसाहेबांनी दिल्लीपतची चाकरी करावी असे सांगणारा, पुत्राच्या पराभवामुळे इरेने युध्दास प्रवर्तणारा अबदाली भाऊसाहेबांच्या पराक्रमाचे कौतुक करतो. यातून तो जिद्दी, शूर, मुत्सद्दी असल्याचे दिसते.

### (६)सुरजमल जाट-

भरतपूर येथे राहून गनिमी काव्याचा आश्रय करून मराठ्यांनी अबदालीशी युध्द करावे असा भाऊसाहेबांस सल्ला देणारा. ''बादशाही खजीना हुकमाबिगर खर्च करावयाचा नाही. तुम्ही लुटावयास सिध्द जाहले असता पुढे मागे आम्हास नामोशी येईल असा घाट बोलण्यात आणून राजकारणाची भूमिका निभावणारा एक मुत्सद्दी, राजकारणी, या रूपात सुरजमल जाट दिसून येतो.

## भाषाशैली

पानिपतच्या बखरीत डौलदार भाषाशैली आढळून येते. त्यातून बखरकाराचे व्यक्तिमत्व पहायला मिळते. पानिपतचा बखरकार पक्षनिष्ठ असल्याने त्याचे लेखन आवेशपूर्ण आढळते.

त्याचप्रमाणे भाषेच्या विशिष्ट लकबीत किंवा कल्पना विचारांच्या मांडणीत त्याचे व्यक्तित्व जाणवते. बखरीत थोड्याफार प्रमाणात कल्पना विलास, वीर, करूण, अद्‌भूत रस तसेच उत्कृष्ट वर्णनशैली, डौलदार भाषा इत्यादी साहित्यातील गुण दिसून येतात.

१.लयबध्दता व नादमाधुर्य-पानिपतच्या बखरीत अनेक विशेषणांचा वापर करून लयबध्दता निर्माण केलेली दिसून येते. उदा. धीट होऊन नीट फौजेत चालून घेतले, शेलके घोडे व शेलके माणूस व शेलके हत्ती, शेलक्या सांडणी साठ कोस नित्य चालणार व शेलके जवाहिर, शेलकी तलवार व शेलक्या तोफा ---शेलके साहित्य--- वगैरे सर्वस्व बुडाले.'' नजिबखान रोहिला जसा ससा भाणवसातें तसा. या शैलीत अनेक विशेषणांच्या पुनरूक्तीमुळे लयबध्दता व नादमाधुर्य यांचा प्रत्यय येतो. प्रत्यक्ष युध्दभूमीवर 'भूमंडळ नादेकरून तुंबळ जाहाले, हरहर महादेव ! अल्ला खुदा ! या रहिमान रहीम' इत्यादी संबोधने लयबध्द अवतरली आहेत.

२.सुगमता व सुबोधता-पानिपतच्या बखरीत बखरकाराने काव्यात्मक दृष्टांत आणि दाखले देवून आशयाची अभिव्यक्ती साधलेली आहे. समर्पक असे दृष्टांत दिलेले आहेत. पानिपतच्या युध्दात भाऊसाहेब म्हणजे, 'कल्पांतीचा आदित्य' भासले. हे रूपक दिव्योदात्त झाले आहे. एकमेकावर पर्जन्यप्राय कोसळू लागले, आम्ही तरि सतीचे वाण घेतले, आता तुम्हास ईश्वर साह्य आहे अशी अनेक उपमाने, दृष्टांत व दाखले देवून सुगमता व सुबोधता साधली आहे. गगन, सूर्य, चंद्र, तारे, अग्नी, कमळ, नदी, सागर, पर्वत, पर्जन्य, इत्यादी उपमाने दिसतात. बखरकार युध्दाचे वर्णन कसे करतो ते पाहण्यासारखे आहे. तो म्हणतो-''तेव्हा युध्दास तोंड लागले. दारूण संग्राम जाहाला. हवद्यास हवदे, राऊतास राऊत, एकमेळ जाहाला---एकच रणधुमाळी दोन्ही सैन्यात माजली. धुरेकरून दिनमणीचा अस्त जाहाला असा भास पडला. घे घे हीच गर्जना उठली.'' लहान लहान सुगम वाक्यातील हे युध्दवर्णन दृश्यात्मक झाले आहे.

३.काव्यात्मकता-पानिपतच्या बखरीत बखरकाराने ऐतिहासिक सत्यासाठी काव्यात्मक अभिव्यक्ती योजलेली दिसून येते. त्यामुळे त्यात काव्यात्मकता आणि कलात्मकता यांचा सुंदर समन्वय साधलेला दिसून येतो जसे, ''ग्रीष्म ऋतूच्या दिवसात मेघांचे ढग उठतात आणि विद्युल्लता चमकून लागलीच नाहीशी होते, त्याप्रमाणे भाऊसाहेबांनी संग्रामात उडी घेतली.'' 'भाऊसाहेब केवळ परशुराम अवतार.' भाऊसाहेबांच्या मृत्यूची वार्ता ऐकून नानासाहेब पेशवे यांनी केलेला शोक काव्यात्मतेमुळे अधिक गहिरा झाला आहे. ते म्हणतात-''माझी आंधळ्याची काठी चोरून नेली ! माझे धनाचा चरू कोणी चोरून नेला तो कळेना !''

४.सुभाषितसंपन्नता-पानिपतच्या बखरीत बखरकाराने निवेदन भारदस्त व अर्थपूर्ण करण्यासाठी अनेक सुभाषितांचा वापर केलेला दिसून येतो. 'सत्कीर्ती करून मरावे.' 'संपूर्ण वसुंधरेचे राज्य करीन किंवा इंद्रपदीचे घेइन.' इ. वाक्यांतून विचारपूर्णता दिसून येते. 'जेथे

खावंदाचा जोडा पडेल तेथे माझे शिरकमल पडेल.' या जनकोजीच्या वाक्यात स्वामीनिष्ठेचा उत्कर्ष दिसतो. 'भारती युध्दासमान सदाशिवपंतांनी युध्द केले.' भाऊंनी प्रताप कर्णाप्रमाणे केला.' या वाक्यातील उपमा लक्षणीय आहेत.

५.अनुभवसंपन्नता-बोली भाषेतील म्हणींचा उपयोग करून बखरकाराने निवेदनात कौशल्य आणलेले आहे. लोकजीवनातील व्यवहारातील या म्हणींमुळे ऐतिहासिक आशयाची अभिव्यक्ती अधिक तजेलदार झालेली आहे. जाटांविषयी विचार करून 'तुम्हास जे मान्य ते आम्हास ही मान्य.' असे भाऊसाहेबांनी दिलेले उत्तर तसेच युध्दात अखेरच्या क्षणी भाऊसाहेबांनी मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे, दमाजी गायकवाड यांनी सांगितले की,"आजचा निदान समय शंभर वर्षे पूर्ण भरली. आणि आज सतीचे वाण घेतले." या वाक्यातून अनुभवसंपन्नता प्रकट होते.

६.अर्थपूर्णता-बखरीत वाक्प्रचारांचा उपयोग करून प्राचीन मराठी गद्यशैलीचा विकास आणि वैभव यांचे दर्शन बखरकाराने घडविलेले दिसते. 'आमचे पारणे जाहले, आमी तरी सतीचे वाण घेतले.' 'सदाशिवपंतांनी कुतरतोड करून सर्व शत्रूंस दामटून घेतले.' इत्यादि वाक्प्रचारातून बखरीला एक वेगळाच अर्थ प्राप्त झालेला दिसून येतो.

७.वक्तृत्वपूर्णता- या बखरीमध्ये अनेक ठिकाणी वक्तृत्वपूर्ण विधाने आली आहेत. त्यामुळे तेथील वातावरण जिवंत होते. 'विश्वासरावसाहेब, तुमचे वय लहान. तुम्ही सुखाची जाती तिलप्राय अनुभवली नाही.----रावसाहेब, तुम्हास मी मरणाचे घरी आणले.' -ह्या भाऊसाहेबांच्या उद्‌गारांत वक्तृत्व लपले आहे. त्यामुळे त्यातील कारूण्य गहिरे होते. मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे असे लहान थोर सरदार भाऊसाहेबांजवळ आले. त्यांनी सांगितले. - "आज सव्वा महिन्यात तवाई सर्वांनी सोसली. अन्नपाण्यावाचून घोड्यामाणसांचे प्राण जातात---अन्नावाचून हातपाय सुजतात. तरवार कोणत्या रीतीने करावी? ---विनाशकाळासारखी तुमची बुध्दी जाहली.----तुमचे बुध्दीस भ्रंश जाहला. म्हणून आपण तिळमात्र कोणाचे ऐकत नाही. उगीच हेका केला तो या समयी फळास आला.---तुम्ही सर्वांचा घात केला. आपले हाते सर्व वैभव बुडविले." मराठा सरदारांच्या या वक्तृत्वपूर्ण भाषणात भाऊसाहेबांबद्दल नाराजी आहे, राग आहे. या दोन्ही भावनांचा इथे उत्कर्ष झालेला दिसतो.

## संवाद लेखन

पानिपतच्या बखरीमध्ये संवादामुळेच इतिहासातील व्यक्ती आणि घटना यांना जिवंतपणा लाभलेला आहे. संवादामुळेच व्यक्तींचे व्यक्तिमत्व आणि तो प्रसंग डोळ्यांसमोर उभा राहतो. त्यातील स्वगते, भाषणे, संभाषणे, आव्हाने आणि आवाहने इत्यादींमुळे बखरकाराचे निवेदन अधिक भारदस्त आणि जिवंत होते. पानिपतच्या बखरीत अनेक ठिकाणी संवाद आलेले आहेत.

ते संवाद त्या त्या प्रसंगातील घटना म्हणजे नाट्य फुलवतात. बखरकाराने त्या युध्दातील अनेक प्रसंग हे आपल्या संवाद लेखनातून उठावदार केलेले आहेत.

काही उदाहरणे-

१)''कैलासवासी चिमाजी आप्पा यांनी पूर्वी बहुत पराक्रम केला. त्यांचे चिरंजीव भाऊसाहेब, हे लढाईस मागे हटणार नाहीत. शत्रूस पराभवितील किंवा आपण कैलासवासी होतील त्यांत सहसा अन्यथा नाही. याकरिता त्यास सहसा पाठवू नये.'' महादजी पंत पुरंदरे.

२)''रावसाहेब ! तुम्हास मी मरणाचे घरी आणले. ही गोष्ट सर्वोपरी आमचे पासून गेली.''-भाऊसाहेब.

३)--आम्ही तरी सतीचे वाण घेतले, आता तुम्हास ईश्वर साह्य आहे.''-भाऊसाहेब.

''आपण वडील संनिध असता मला भय काय?'' -विश्वासराव.

४)''उद्या सर्वांनी खंदकपार होऊन मारता मारता कटुन मरावे.'' भाऊसाहेब.

५)''आमी जीवित्वाची तमा धरीत नाही ! महाराजांचे पुण्य आमचे मस्तकी असता इराणीची बिशाद काय? मारून गर्दीस मिळवून देऊ. आपण काही चिंता न करावी.''-होळकरादि सरदार.

''यश किंवा अपयश महाराज छत्रपतींकडे ! आपण शरीर तृणप्राय मानून मर्दुमकीचा हिय्या न सोडिता समशेरची शर्त करून दाखवावी या परता पराक्रम कोणता-- यश छत्रपतींचे सांभाळावे''- भाऊसाहेब

८)''आज सव्वा महिन्यांत तत्राई सर्वांनी सोसली. अन्न पाण्यावाचून घोड्यामाणसांचे प्राण जातात. पुढे महाराज काय तजवीज सांगणे ती सांगावी ! अन्नावाचून हातपाय सुजले. तरवार कोणत्या रितीने करावी? साहेबी आजपर्यंत यश संपादून शत्रू पादाक्रांत केला. आता सर्व दौलत बुडवून नाश आरंभिला. दुसरे काही एक नाही. विनाशकाळासारिखी तुमची बुध्दी जाहाली. आपणांबरोबर आम्हा सर्वांची घरे बुडतात. आमची रांडा पोरे आमच्या डोळ्यांदेखत इराणी घेऊन जातो असा समय प्राप्त जाहला. तुमचे बुध्दीस भ्रंश जाहला, म्हणून आपण तिळमात्र कोणाचे ऐकत नाही. उगीच हेका केला तो या समयी फळास आला. आपण सर्वांचे मान्य करून सलूख करून देशी गेलो म्हणून गांडू जाहालो असा अर्थ नाही. या हट्टाने सर्व लयास गेले. काही आहे तेही जाणार. आता अंत राहिला नाही. तुमच्या लष्करची खराबी इराणीस कळली. आता सर्वस्वी बुडवलो. काळचक्रात सर्व पडलो. उत्तम गोष्ट बनून न आली. पहिल्यानेच सलूख संपादिला नाही, आता इराणी तुम्हास खातरेत आणीत नाही. हेका केल्यामुळे दौलत स्वारी बुडाली. यासमयी या ठायी श्रीमंत राजश्री नानासाहेब असते तरि कसच्या गोष्टीचा हेका

न करिते. तुम्ही प्राणानिशी जाता. तुमचे चित्तात असे येत असेल. इराणीचा मजकूर किती? मारून घुडकावून देऊ ! ही गोष्ट सांगता खरी , परंतु तो प्रसंग आता नाही. हा जीव तुमचे अन्नाचा. या प्रसंगी खर्च जाहाला असता चांगला, परंतु अगोदर अन्नावाचून डोळ्यांपुढे अंधाऱ्या येतात. तेव्हा युध्दाची उमेद कशी धरावी? आता जीवित्वाची तमा धरून रांडापोरे वाचतात असा अर्थ नाही. तुम्ही सर्वांचा घात केला. आपल्या हातें सर्व वैभव बुडविले. आमच्या डोळ्यादेखत आमची रांडापोरे गिलचा बाटवितो ते दु:ख प्रत्यक्ष दृष्टीने पाहावे. आपण आपला कुटुंबघात आपल्या देखत करून उद्याच्या लढाईत आम्ही सर्व प्राणांनिशी गेल्याने आपली स्वारी फत्ते होते की काय?''-होळकरादि सरदारांच्या मनातले विचार इथे स्पष्ट झाले आहेत. बखरीतील हा प्रदीर्घ संवाद आहे.

९)''मराठे बडे कट्टे लढनेवाले. उनके आंगू खुदा खडा रहनेका नाही. अनाजका दुकाल पडा तोबी लढनेकू हटेले खडे रहते है--मराठे लोगोंका बडा जोर नजर आता है।'' हे अबदल्ली, सुजातदौले व नजिबखानचे संवाद उर्दुमय आहेत. त्यातून मराठ्यांच्या वीरवृत्तीवर प्रकाश पडतो.

एकंदरीत बखरकाराने केलेल्या संवादलेखनाने त्या त्या व्यक्तीच्या स्वभावावर प्रकाश पडतो. त्या संबंधीच्या त्या व्यक्तीच्या भावना आणि विचार त्यातून व्यक्त होतात. या बखरीतील संवादलेखन जिवंत व परिणामकारक झाले आहे.

## रसपरिपोष

पानिपतच्या बखरीत कथानक रसाळ करण्यासाठी बखरकाराने व्यक्ती, घटना, प्रसंग हलत्या बोलत्या केल्या आहेत. आपल्या कल्पनेच्या सहाय्याने त्यात हवे तसे रंग भरून, त्या जिवंत केल्या आहेत. त्यामुळे त्यावेळचा मराठ्यांचा संपूर्ण इतिहास आपल्या नजरेसमोर उभा राहतो. युध्दात वीरवृत्तीने भारलेल्या व्यक्ती, त्यांचे पराक्रम, त्यांची आव्हाने आणि आवाहने यासाठी वीर रसाचा आविष्कार झालेला आहे. युध्दात अपयश आल्यानंतर त्या सैन्याचे पलायन, लोकांची भयभीत अवस्था, युध्दात झालेली वाताहत, सैनिकांचे मृत्यू इ. वर्णनांच्या कारूण्यातून करूण रसाचा आविष्कार झाला आहे. त्याच बरोबर बखरींना कलात्मकता आणण्यासाठी काही दृष्टांत, उपमा असे अलंकार योजून वीर आणि करूण रसाबरोबरच अद्‌भुत, रौद्र व बीभत्स रसांचाही थोड्याफार प्रमाणात आविष्कार झाला आहे.

वीररस-वीरांची कृती, उक्ती, शस्त्रांची घाई, बाणांचा वर्षाव, तोफांचा भडिमार यांचे वीररसपूर्ण वर्णन हा बखरीचा विशेष आहे. भाऊंचे वीरवृत्तीपूर्ण वर्णन लक्षणीय आहे. पानिपतच्या युध्दात उतरणारे सरदार हे क्रोध, त्वेष, आवेश यांनी बेभान झालेले सरदार शहाणव कुळीचे बावन बीरदाचे धनी आहेत. तीस हजार फौजेनिशी जनकोजी शिंदे व समशेर बहाद्दूर

यांनी इराणी दुराणी यांच्याशी हात घाईची लढाई केली तेव्हाचे वर्णन किंवा तीन टोळ्या करून खासे उभे राहिले तेव्हा तेजूरशहाने दिन दिन म्हणून त्यांच्यावर चाल केली. तेव्हाचे रणधुमाळीचे वर्णन डोळ्यासमोर उभे राहते. 'पर्जन्यप्राय कोसळू लागले, कडोविकडीने युध्द खेळू लागले, सतीचे वाण घेतले, मुद्यावर मुर्दे पडू लागले. वीरांच्या नजरा फिरोन गेल्या, हौदे एकास एक लागोन जोरावारीने लढो लागले.' अशा वीरश्रीयुक्त शब्दात शस्त्रांच्या व वाद्यांच्या नादाने बेहोश झालेल्या वीरांच्या पराक्रमांचे चित्रण केले आहे. पानिपतच्या रणसंग्रामात मराठी सैनिकांनी 'हर हर महादेव !' ही गर्जना करून घोडे घातले. "एकच रणधुमाळी, दोन्ही सैन्यात माजली, धुरे करून दिनमणीचा अस्त जाहाला असा भास पडला. घे घे हीच गर्जना उठली. मुद्यावर मुर्दे पडू लागले. वीर रणामध्ये माजले. रणमद चढला. केवळ दशाग्नी, शताग्नीशी मारू लागले." इ. वर्णने तसेच अखेरच्या क्षणी "हिंदूंचे मुसलमान होऊ परंतु छत्रपतींचे नाव वाढवू." म्हणून लढणारे सैनिक आणि "सदाशिवभाऊंनी घोड्याखाली उडी टाकून, दोहो हाती पट्टे चढवून जिवाची तमा न धरता धीट होऊन नीट फौजेत चालून घेतले किंवा निशाण बारदारांनी निशाणे घेवून नगारा, नौबती करून एकदाच गर्जना केली. तेव्हा भूमंडल नादेकरून तुंबळ जाहाले. तेणेकरून रणरंगधीरास वीरश्रीची स्फुरणे आली." असा पराक्रमी सरदारांनी केलेला पराक्रम त्यांच्या वीरश्रीयुक्त गाथा, प्रत्यक्ष रणक्षेत्रावर सैनिकांना दिलेले प्रोत्साहन, त्यांच्यात निर्माण केलेली हिंमत आणि युध्दास प्रवृत्त करणारी प्रेरणा ही देखील तितकीच वीरश्रीयुक्त आहे. या प्रत्येक ठिकाणी वीररसाचा परिपोष सहज होताना दिसतो. या बखरीत जास्त प्रकर्षाने व्यक्त होतो तो वीररसच !

करूणरस-पानिपतच्या युध्दात अपयश आल्याने मराठी सैनिक दु:खी, कष्टी झाले. बखरकाराने व्यक्तिजीवनातील कारूण्याचे दर्शन अधिक गडद केले आहे. भाऊसाहेबांनी विश्वासरावांना आपल्याबरोबर युध्दास आणल्यामुळे भाऊसाहेब म्हणतात, "रावसाहेब ! तुम्हास मी मरणाचे घरी आणले. आम्ही तरी सतीचे वाण घेतले, आता तुम्हास ईश्वर साह्य आहे." तसेच सर्व सैनिकांना भाऊसाहेब युध्दप्रसंगी म्हणतात, "उद्या सर्वांनी खंदकपार होऊन मरता मरता कटून मरावे." या वाक्यातून शोकात्म अभिव्यक्ती ~~निर्माण~~ झालेली दिसते. विश्वासरावांना भाऊसाहेब म्हणतात, "विश्वासराव साहेब तुमचे वय लहान, तुम्ही सुखाची जाती तिलप्राय अनुभवली नाही.---हे महत्तर अपेश श्रीसांबाने माझे विभागास आणले." येथील करूणरस अधिक उत्कट झाला आहे. पानिपतच्या युध्दात मराठ्यांची झालेली वाताहत कळल्यावर नानासाहेब पेशव्यांनी केलेला शोक अत्यंत समर्पक शब्दांत व्यक्त झाला आहे. "हाय, हाय, भाऊ माझे दृष्टीस केव्हा पडशील? माझी आंधळ्याची काठी चोरून नेली ! माझे धनाचा चरू कोणी चोरून नेला कळेना ! आता देहत्याग करावा अथवा संन्यास घ्यावा---ह्यां शोकार्त

प्रसंगातील शोकविव्हलता व भावावेगाची रसपूर्ण अभिव्यक्ती यांच्यामुळे येथील कारूण्य रसिक मनात घर करून राहते.

बीभत्स रस-पानिपतच्या बखरीत वीर आणि करूण रसाबरोबरच बिभत्स वर्णनेही आली आहेत. "तीन चार तासपर्यंत एकच घाई शस्त्रसंधानाची जाहाली." मुर्द्यावर मुर्दे पडू लागले. वीरांच्या नजरा फिरोन गेल्या. आपपर कोणी ओळखेनासे जाहाले. वीर रणामध्ये माजले. रणमद चढला, खांशा खांशाचे हौदे एकास एक लागून जोरावारीने लढो लागले. केवळ दशाग्नी शताग्नीशी मारू लागले. कोणास क्षते वर्मी लागली. कोणी रणांगणी मूर्च्छित पडले. कोणांची शिरे तुटोन धडांवेगळी जाहाली, कोणांची उदरे फुटोन अंतरमाळा लोंबू लागल्या. बिभत्स शरीरे दिसो लागली." इत्यादी वर्णनातून बिभत्स रसाच्या छटा दिसून येतात. अखेरच्या निकराच्या युध्दातील वाताहातीचे हे वर्णन पहा-"एक धारातीर्थी आमचे पडले. एक शूरत्व करून विराले---तेव्हा पिशाच समुदाय आनंदेकरोन नाचो लागला की चारशे वर्षे झाली. ते समयी अठरा अक्षौहिणी दळाचे रक्तमांस भक्षिले." या वर्णनातून बिभत्स रसांची छटा जरूर जाणवते.

रौद्ररस-पानिपतच्या बखरीत रौद्ररसाचे वर्णन विशेषता दिसून येत नाही. अपवादात्मक एखादे उदाहरण दिसून येते. भाऊसाहेब पानिपतच्या रणसंग्रामात त्वेषाने उतरतात. तेव्हा त्यांचा चेहरा भयावह दिसत होता. भाऊसाहेब अंबारीत बसताच सर्व शरीर लाल जाहाले व नेत्र ही आरक्त जाहाले. त्यासमयी भाऊ केवळ 'कल्पांतीचा आदित्य' भासला. याप्रमाणे भयावह दिसू लागला. त्यावेळेस कोणाच्याने पहावेना. या वर्णनात रौद्ररसाची छटा निश्चित जाणवते.

वत्सलरस-पानिपतच्या बखरीत भाऊसाहेबांची काही भाषणे वत्सल रसमय आहेत. "विश्वासराव साहेब तुमचे वय लहान तुम्ही सुखाची जाती तिलप्राय अनुभवली नाही. तुम्हासारखे सगुण पुत्र, उभयतांची ममता तुमचे ठायी विशेष रावसाहेब ! तुम्हास मी मरणाचे घरी आणले, आम्ही तरी सतीचे वाण घेतले. आता तुम्हास ईश्वर साध्य आहे." इत्यादी वर्णनातून वात्सल्य रस निर्माण झालेला दिसून येतो.

एकंदरीत विविध रसांचा प्रत्यय उत्कटतेने देणारी ही पाणिपतची बखर म्हणूनच रससंपन्न झाली आहे.

थोडक्यात, आटोपशीर व एका रेषेत वेगाने जाणारे ओघवते कथानक, ठसठशीत उत्तम व्यक्तिचित्रे, तो तो प्रसंग आणि व्यक्ती जिवंत करणारी सहज सुंदर भाषाशैली, वक्तृत्वसंपन्न व नाट्यपूर्ण संवादलेखन, भाव-भावनांनी ओथंबलेले रससंपन्न प्रसंग, युध्दवर्णनातील रेखीव दृश्यात्मकता आणि वेधक अल्पाक्षर रमणीयता या वाङ्मयगुणांनी नटलेली 'पाणिपतची बखर' ही मराठी बखर वाङ्मयास लाभलेली एक श्रेष्ठ देणगी आहे.

# संदर्भ


| | |
|---|---|
| १.पाणिपतची बखर | रघुनाथ विनायक हेरवाडकर<br>व्हिनस प्रकाशन, पुणे<br>तिसरी आवृत्ती जुलै १९९७,<br>पृ.क्र.९ (प्रस्तावना) |
| २.तत्रैव | पृ.क्र.८ |
| ३.तत्रैव | पृ.क.८ |
| ४.तत्रैव | पृ.क.९ |
| ५.तत्रैव | पृ.क.१४ |
| ६.तत्रैव | पृ.क.३४ |
| ७.तत्रैव | पृ.क.३६ |
| ८.तत्रैव | पृ.क.३७ |
| ९.तत्रैव | पृ.क.३७ |
| १०.तत्रैव | पृ.क.४४ |
| ११.तत्रैव | पृ.क.४५ |
| १२.तत्रैव | पृ.क.४८ |
| १३.मराठी बखर गद्य | डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये<br>मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे<br>तिसरी आवृत्ती १९८८<br>पृ. क्र. ४६ |
| १४.उपनी १ | पृ. क्र. ५१ |